# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/ 28193087.
क्रीडा विभाग


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/क्री.वि/७५४/2023-24 दि. २५/०२/२०२४

## // जाहिर आवाहन //

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी या खेळाकरिता खेळाडू दत्तक घेऊन व्यवसायिक पुरुष संघ तयार करणे**

शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार क्रीडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कबड्डी या खेळाचे व्यवसायिक संघ तयार करण्यात येणार आहे. कबड्डी या खेळातील उदयोन्मुख खेळाडूंची मैदानावरील थेट शारीरिक क्षमता आणि प्रत्यक्ष मैदान निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार असुन याकरीता दि.12/03/2024 पर्यत अर्ज मागविण्यांत येत आहेत. इच्छुक अर्जदारांनी आपले अर्ज क्रीडा विभाग, पहिला मजला, स्व्. इंदिरा गांधी भवन, मुख्यकार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे जमा करण्यात यावेत.

निवड चाचणीव्दारे पात्र खेळाडूंना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मासिक विदयावेतनावर करारान्वये संघात खेळण्याकरीता निवड करण्यात येणार आहे. याबाबतची सर्व सविस्तर माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.mbmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी संबंधित खेळाडूंनी यांची नोंद घ्यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (क्रीडा विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.
क्रीडा विभाग


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/क्री.वि/१५४/2023-24 दि. २५/०२/२०२४

## ।। जाहीर सूचना ।।

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी या खेळाकरीता खेळांचे व्यवसायिक संघ तयार करणेबाबत**

राज्यातील क्रीडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार उदयोन्मुख क्रीडापटूंना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी पुरुष खेळाचे व्यवसायिक संघ तयार करणेकामी खेळाडूंकरीता खालील अटी व शर्तीनुसार थेट शारीरिक क्षमता चाचणी व मैदान निवड चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे.

1. कबड्डी या खेळाचे संघ तयार करण्याच्या दृष्टीने संबंधित खेळातील अधिकृत जिल्हा व राज्य क्रीडा संघनेच्या सहकार्याने अनुक्रमे 15 खेळाडूंची निवड करण्यात येईल.
2. सदरहू खेळाडूंची नावे निश्चित करतांना यामध्ये विदयापीठ, वरिष्ठ राज्य व राष्ट्रीयस्तरावर संघाचे प्रतिनिधीत्व केलेले कबड्डी या खेळाचे खेळ निहाय 15 खेळाडू निश्चित करण्यात येतील. यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खेळाडू उपलब्ध् न झाल्यास महाराष्ट्रातील इतर जिल्हयातील खेळाडूंची निवड करण्यात येईल.
3. खेळाडूंचे संघातील निवड ही महापालिकेच्या संघातुन खेळण्यासाठी असेल आणि त्यांना प्रति महिना रक्कम् रु.20000/- मासिक ठोक मानधन म्हणुन अदा करण्यात येईल. याबाबतचा खेळाडूंकडून रु.100/- स्टॅम्पपेपरवर करार (बंधपत्र) करुन घेण्यात येईल.
4. सदरहू खेळांचे नियमित होणाऱ्या स्पर्धाचे कालावधी विचारात घेऊन खेळाचे हंगाम म्हणून करार केल्याच्या दिनांकापासुन 11 महिन्यापर्यंत राहील.
5. सदर संघाकरीता खेळाडूंची वयोमर्यादा कबड्डी पुरुष 30 वर्षाआतील राष्ट्रीय स्तरावरील पुरुष खेळाडूंना वयामध्ये 35 वर्षापर्यंत शिथीलता देऊन संघात घेण्याचे अधिकार मा. आयुक्त् यांना असतील.
6. निवड झालेल्या खेळाडूंना क्रीडा अधिकारी/क्रीडा मार्गदर्शकांच्या सुचनेनुसार वेळोवेळी सरावास उपस्थित रहावे लागेल. त्याचबरोबर क्रीडा विभागाकडुन सुचित केले जाईल त्यावेळी महापालिका शाळांमधील मुलांना आठवडयातील एक दिवस प्रशिक्षण देण्याचे काम करावे लागेल.
7. सरावादरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास त्यावर महानगरपालिका रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येईल.
8. प्रत्येक वर्षी खेळाच्या हंगामानुसार संघातील खेळाडूंची नव्याने फिटनेस चाचणी व निवड चाचणी प्रक्रीया राबविण्यांत येऊन त्यानुसार खेळाडूंची अंतिम निवड त्या त्या हंगामासाठी करण्यात येईल.
9. निवड झालेल्या खेळाडूंना महानगरपालिकेस निमंत्रित केलेल्या सर्व स्पर्धामध्ये सहभागी होणे बंधनकारक राहील.
10. मिरा भाईदर महानगरपालिका संघ कोणत्याही स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर स्पर्धेत पारितोषिक रक्कम् मिळाल्यास सदर मिळालेली रक्कम् स्पर्धेत सहभागी खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्यात वाटपीत होईल. मात्र स्पर्धेतील स्मृतीचिन्ह् मिरा भाईदर महानगरपालिका क्रीडा विभागात जमा करतील.

11. निवड झालेल्या खेळाडू व मार्गदर्शक यांना सराव व स्पर्धेदरम्यान क्रीडा गणवेश व इतर साहित्य् आवश्यकतेनुसार मोफत उपलब्ध् करुन देण्यात येईल. मात्र त्यांचा गैरवापर करण्यात येऊ नये.
12. खेळाडूंना एकुण मासिक ठोक विदयावेतना व्यतीरीक्त् नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर कोणतेही हक्क्/अधिकर/लाभ मिळणार नाहीत.
13. एखादा खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास किंवा गैरवर्तणूक करत असल्याचे निदर्शनास आल्यास क्रीडा विभागाचे अहवालानुसार त्यांचा करार संपुष्ठात आणण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त् यांचे असतील.
14. एखादा दर्जेदार खेळाडू इतर ठिकाणी नोकरी रिक्त् असेल/शालेय/विदयापीठात शिक्षण घेत असेल आणि त्याला उच्चस्तरावर खेळण्याची संधी मिळत नसल्याने तो खेळाडू मिरा भाईंदर महानगरपालिका संघातून खेळण्यास इच्छुक असेल आणि निवडचाचणीव्दारे निवड होत असेल तर त्या खेळाडूस मिरा भाईंदर महानगरपालिका संघातुन खेळण्यास परवानगी असेल आणि त्यांस मासिक विदयावेतन न देता त्यांना स्पर्धा कालावधी व स्पर्धेकरीताचे प्रवास दिवसांकरीता प्रति दिन रु.1000/- याप्रमाणे भत्ता व क्रीडा विभागाकडील दरकरारानुसार अथवा निहीत केलेनुसार आहार भत्ता देये राहील.
15. उक्त खेळांकरीता अर्हता धारणा करणाऱ्या खेळाडूंनी सोबतच्या विहित नमुन्यातील अर्जासह सर्व मुळ कागदपत्रे छायांकित प्रतीसह थेट मैदान चाचणीकरीता उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप-आयुक्त (क्रीडा विभाग)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## अर्जाचा नमुना

(.............................. या खेळाच्या संघाकरीता अर्ज)

प्रति,
मा. उप-आयुक्त्
क्रीडा विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

1. पुर्ण नाव :-..............................................................................................................
(प्रथम आडनाव) (प्रथम नाव) (वडिलांचे नाव)

2. पत्ता :-..............................................................................................................
..............................................................................................................
..............................................................................................................

3. मोबाईल संपर्क क्रं. :- Email ID :-

4. जन्मतारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

: दि.01/01/2024 रोजीचे वय

| एकुण वर्ष |
|---|
| |

5. शैक्षणिक अर्हता :-

| उत्तीर्ण केलेली परिक्षा | विदयापीठ/मंडळाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी/श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

6. विदयापीठ, जिल्हा, राज्य्, राष्ट्रीय स्तरावरील खेळातील कामगिरीबाबतची माहिती

| स्पर्धा स्तर् | दिनांक | स्थ्ळ | आयोजक | स्थान/क्रमवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. अवगत असलेली भाषा:-

| मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|
| | | |
| | | |

8. आपणा विरुध्द् न्यानप्रविष्ठ् प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम् इ. कारवाई सुरु आहे काय ? होय / नाही........ (असल्यास संक्षिप्त् माहिती दयावी)

..............................................................................................................
..............................................................................................................

9. अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

1)
2)
3)
4)
5)

वर नमुद केलेली माहिती खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी कोणत्याही टप्प्यावर नेमणुक रद्द् करण्यात येईल आणि माझे विरुध्द् कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

( )

**खेळाडूंचे नांव व सही**